**<u>वादीची शपथेवर उलटतपासणी प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एन.टी.रातवडकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

१७. हे म्हणणे खरे आहे की,माझे पतीचा मृत्यू दि.२३/०६/२०१४ रोजी झाला, माझे पतीला एकूण दोन भाऊ व तीन बहिणी आहेत, आमचे कुटूंबाच्या जमिनींचे आगोदर तोंडी वाटप झाले त्यानंतर नोंदणीकृत वाटप दि.०७/०२/१९९८ रोजी झाले, सदर नोंदणीकृत वाटपपत्रावर माझे पतीची सही आहे.

१८. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीचे हयातीमध्ये त्यांनी दि.०७/०२/१९९८ रोजीचे नोंदणीकृत वाटपाविरूद्ध हरकत घेतली नाही.

प्रश्न – शेत गट क्र.३३० व ३३५ या जमिनींसंबंधी कलम ३२म चा दाखला प्रतिवादीक्र.०१ चे नावे असल्याची तुम्हाला माहिती आहे काय?

उत्तर – सदर दाखला प्रतिवादी क्र.०१ चे नावे तो एकत्र कुटूंबाचा कर्ता असल्यामुळे होता.

हे म्हणणे खरे आहे की, सदर ३२ म चे दाखल्यामध्ये प्रतिवादी क्र.०१ एकत्र कुटूंब प्रमुख म्हणून तो त्याला दिल्याबाबत मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेत गट क्र.५१८ प्रतिवादी क्र.०१ याला एकट्याला कुळ अधिनियम तरतूदी अन्वये मिळाली आहे.

१९. मी साक्षीला येण्यापूर्वी शेत गट क्र.५९१ चा साताबारा उतारा पाहिलेला नाही. मला शेत गट क्र.५९१ मध्ये साधारणपणे ५० एकर जमिन असल्याची ऐकून माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५९१ चे सातबारा उताऱ्यामध्ये प्रतिवादींव्यतिरीक्त तुकाराम महादू मोरे, बबन शिवराम सानप, रामचंद्र कृष्णा सानप यांची सह मालक म्हणून नावे नमूद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तुकाराम महादू मोरे, बबन शिवराम सानप, रामचंद्र कृष्णा सानप व प्रतिवादी क्र.०१ यांचेमध्ये गट क्र.५९१ च्या जमिनीची विभागणी झालेली नाही, नमूद चार व्यक्तींनी गट क्र.५९१ मधील संपूर्ण जमिनीची विक्री सन २००८ मध्ये केली. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५९१ चे सातबारा उताऱ्याला सध्या प्रमोद घाडी,

जी.एस.राजाराव, के.रघुरामा राजू, पी.व्ही.व्ही.प्रसाद व अक्री व्यंकटवरूण गांधी यांची नावे खरेदीदार म्हणून आहेत, त्यांना प्रस्तूत दाव्यामध्ये पक्षकार न करण्याचे काण मी सांगू शकत नाही. नमूद व्यक्तींची नावे सदर जमिनीला फेरफार नोंद क्र.८१० ते ८१४ अन्वये लागल्याची मला माहिती आहे. शेत गट क्र.५९१ ही जमिन विक्री झाल्याबाबत माहिती मला सन २००८ मध्ये मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की,त्यावेळी माझे पती जिवंत होते, त्यांनी फेरफार नोंद क्र.८१० ते ८१४ विरूद्ध अपिल केले नाही, त्याचप्रमाणे माझे पतींनी सदर खरेदीखता विरूद्ध तक्रार केली नाही.

२०. हे म्हणणे खरे आहे की, प्रमोद घाडी, जी.एस.राजाराव, के.रघुरामा राजू, पी.व्ही.व्ही.प्रसाद व अक्री व्यंकटवरूण गांधी यांनी शेत गट क्र.५९१ संबंधी केलेली खरेदीखते मी अभिलेखावर दाखल केलेली नाहीत, मी त्यांना प्रस्तूत दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला फेरफार नोंद क्र.८१० ते ८१४ बाबत माहिती आहे, सदर फेरफार ज्या खरेदीखतावरून झाले त्यातील आर्थिकव्यवहाराची मला माहिती आहे.

२१. हे म्हणणे खरे आहे की, शेत गट क्र.३३० व ३३५ चे कलम ३२म च्या दाखल्याविरूद्ध मी किंवा माझे पतीने तक्रार केली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, प्रतिवादी क्र.०१ तिचे दीर आहेत, ते तिला व तिचे पतीला नमूद दोन्ही जमिनींमध्ये हिस्सा देती असे म्हणायचे. हे म्हणणे खरे नाही की, शेतगट क्र.३३५ ची जमिन तोंडी वाटपाने आम्हाला मिळाली नव्हती, शेत गट क्र. ३३० व ५१८ ही प्रतिवादी क्र.०१ ची एकट्याची मिळकत आहे, गट क्र.५९१ चे अनुशंगाने झालेली खरेदीखते कायदेशीर आहेत, दि.०७/०२/१९९८ रोजी शेतजमिनींचे नोंदणीकृत वाटप झाल्यामुळे मला वाटप मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादपत्रामध्ये नमूद मिळकत क्र.०१ ते १० चे यापूर्वी वाटप झाले आहे, मिळकत क्र.११ ते १४ केवळ प्रतिवादी क्र.०१ च्या मालकीच्या आहेत, त्यामुळे त्यात मला हिस्सा मागण्याचा अधिकार नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.३३५, ३३०, ५१८ व ५९१ या शेतजमिनींचे माझे पतीला माहिती होती, त्या चारही मिळकती कलम ३२म चे दाखल्यामध्ये प्रतिवादी क्र.०१ च्या नावे आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, त्या त्याचे नावे एकत्र कुटूंबप्रमुख म्हणून होत्या.

२३. हे म्हणणे खरे आहे की,गट क्र.३३० मधील काही जमिन रेल्वेने संपादीत केली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, त्याचा मोबदला केवळ प्रतिवादी क्र.०१ ने घेतला, आम्ही प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना पाठविलेल्या नोटीसला त्यांनी त्यांचे विधीज्ञ श्री.धारप यांचेमार्फत उत्तर पाठविले होते याची मला माहिती आहे, आम्ही पाठविलेल्या नोटीसमध्ये केवळ गट क्र.३३५ चा उल्लेख केला होता. प्रतिवादी क्र.०१ ने गट क्र.३३० मधील जमिन संपादीत केल्याचे अनुशंगाने एकट्याने घेतलेल्या मोबदल्याविरूद्ध आम्ही तक्रार केली नाही.

२४. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९८ मध्ये झालेले तोंडी वाटप माझे पतीला मान्य होते, त्यामुळे त्याने त्याचेविरूद्ध तक्रार केली नाही, नोंदणीकृत वाटपपत्र झाले असताना देखील आम्ही चुकीचा दावा न्यायालयात दाखल केला, ज्या मिळकतींचे वाटप झाले आहे त्यांचेविरूद्ध आम्ही चुकीचा दावा दाखल केला, मी अभिलेखावर खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले व आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.07.10 17:14:40 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.१०.०७.२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रोहा.